

# मी ‘लीला रॉय’ बोलतेय!

माझं नाव लीला रॉय.

जन्म २ ऑक्टोबर १९००. मूळची ढाका – आजचा बांगलादेश. उच्चमध्यमवर्गीय घरात वाढले, पण मनानं मी नेहमीच बंडखोर होते. वडील सरकारी नोकरीत होते, पण अन्यायाविरुद्ध उभे राहणारे. त्यांच्या धैर्याचं बीज माझ्यात लहानपणापासून पेरलं गेलं.

अभ्यासात मी पुढे होते. बेथ्यून कॉलेजमधून इंग्रजीत पदवी घेतली. सुवर्णपदक मिळालं. पण मला केवळ पुस्तकांत रमायचं नव्हतं – समाज बदलायचा होता. महाविद्यालयात असतानाच मी अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. व्हाईसरॉयच्या पत्नीपुढे गुडघे टेकून अभिवादन करण्यास मी विरोध केला. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर कॉलेज बंद ठेवावं, अशी मागणी केली.

ढाका विद्यापीठात प्रवेश मिळवण्यासाठी मला लढावं लागलं. त्या वेळी मुलींसाठी दरवाजे बंदच होते. मी कुलगुरूंना भेटले, सहशिक्षणाची मागणी केली. अखेर माझ्यासह दोन मुलींसाठी संध्याकाळचे वर्ग सुरू झाले. ढाका विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी मिळवणारी मी पहिली विद्यार्थिनी ठरले.

माझ्यावर गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांचा मोठा प्रभाव होता. महिलांचा एक भव्य मेळावा मी आयोजित केला होता. हजारो स्त्रिया जमल्या होत्या. ते पाहून टागोर म्हणाले – **“इतकं मोठं महिलांचं संमेलन मी पाहिलं नाही.”** त्यांनी शांतिनिकेतनच्या महिला विभागाची जबाबदारी मला द्यायची इच्छा व्यक्त केली. पण मी नम्रपणे नकार दिला. कारण मला एका जागी मर्यादित राहायचं नव्हतं – माझं ध्येय व्यापक होतं.

मी गांधीजींचा आदर करत होते, पण माझं मत स्वतंत्र होतं. महिलांची भूमिका फक्त खादी विणण्यापुरती किंवा दारूबंदी पुरती मर्यादित असू नये, असं मला वाटायचं. स्त्रियांना राजकीय शिक्षण, आत्मसंरक्षण आणि नेतृत्वाची तयारी हवी. म्हणून १९२३ मध्ये मी आणि माझ्या बारा मैत्रिणींनी “दीपाली संघ” स्थापन केला. स्त्रियांच्या आर्थिक स्वावलंबनासोबत त्यांना राजकीय दृष्ट्या सजग करणं हे आमचं उद्दिष्ट होतं.

हळूहळू मला जाणवलं – केवळ समाजकार्य पुरेसं नाही; स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय खरी मुक्ती नाही. म्हणून मी क्रांतिकारी मार्ग स्वीकारला. “श्री संघ” या संघटनेत प्रवेश केला. काहींना हे रुचलं नाही. पण मी भीती मानली नाही. १९३० च्या चितगाव उठावानंतर ब्रिटिशांनी आमच्यावर कारवाई केली. माझे सहकारी अनिल रॉय अटकेत गेले. संघटनांची जबाबदारी माझ्यावर आली.

मी “जयश्री” पत्रिका सुरू केली. जागृतीचं मोठं काम तिनं केलं. पण मला अटक झाली. अनेक वर्षे तुरुंगात काढली. तिथेही मी कैद्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवला.

नंतर आम्ही सुभाषचंद्र बोस यांच्या विचारांशी जोडले गेलो. फॉरवर्ड ब्लॉकमध्ये काम केलं. सुभाषबाबूंच्या कार्याची जबाबदारी आमच्यावर होती. १९४२ मध्ये पुन्हा अटक झाली. १९४५ मध्ये त्यांच्या मृत्यूची बातमी ऐकली तेव्हा मी तुरुंगात होते – तो धक्का आयुष्यभर विसरता आला नाही.

संविधानसभेवर माझी निवड झाली. पण देशाची फाळणी निश्चित झाली तेव्हा माझं मन अस्वस्थ झालं. माझं ढाका पाकिस्तानात जाणार होतं. त्या वेदनेत मी संविधानसभेचा राजीनामा दिला. नंतर दंगलीत सापडलेल्या लोकांसाठी काम केलं. नोआखलीत गांधीजींबरोबरही गेले.

स्वातंत्र्यानंतर राजकारणात काम केलं, पण अनिल यांच्या निधनानंतर मी आतून तुटले. तरीही माझा विश्वास कधी ढळला नाही – स्त्रीने स्वतःचं स्वत्व जपलं पाहिजे. मतभिन्नता ही कमजोरी नाही; ती स्वतंत्र विचारांची ताकद आहे.

आज मी नसले तरी माझा संदेश जिवंत आहे – **“भीऊ नका. प्रश्न विचारा. अन्यायाला शरण जाऊ नका. स्वातंत्र्य केवळ देशाचं नसतं – ते मनाचंही असतं.”**